# टिपण्णी

## भारतीय नौदलाच्या निवृत्त जहाजाचे कृत्रिम प्रवाळ निर्माण करून सिधुदुर्ग जिल्ह्यात जागतिक दर्जाचे स्कुबा डायव्हिंग आणि पाण्याखालील पर्यटनाचे आकर्षण निर्माण करणे.

- स्कुबा डायव्हिंग आणि पाण्याखालील पर्यटनाला महाराष्ट्रात जलपर्यटन वाढीसाठी आणि त्या माध्यमातून पर्यटन क्षेत्रात मोठा रोजगार निर्माण करून महाराष्ट्र पर्यटन ब्रँड मजबूत करण्याची मोठी संधी निर्माण झाली आहे परंतु पाण्याखालील विश्व जागतिक दर्जाच्या मापदंडानुसार नसल्याने पाण्याखालील पर्यटन वाढविण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास मर्यादा येत होत्या.
- अमेरिका, ऑस्ट्रेलिया, कॅनडा आणि युरोप मधील अनेक देशांनी स्कुबा डायविंग पर्यटन वाढविण्यासाठी त्यांच्या नौदलातील निवृत्त जहाजांद्वारे समुद्रात कृत्रिम प्रवाळ निर्माण केली.
- अमेरिकेतील फ्लोरिडा प्रदेशात सदर कृत्रिम प्रवाहाच्या माध्यमातून वर्षाला साधारण **40** ते **50** लक्ष कोटींची कमाई होते भारतालाही निवृत्त युद्ध लोकांच्या माध्यमातून कृत्रिम प्रवाळ निर्माण करून पाण्याखालील जलपर्यटनाचा विकास साधता येऊ शकतो, हे याद्वारे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या लक्षात आले.
- भारतीय नौदलाकडे अनेक निवृत्त जहाज असल्याने महाराष्ट्रात भारतीय नौदलाच्या निवृत्त युद्ध नौकेच्या माध्यमातून कृत्रिम प्रवाळ निर्माण करून शेकडो रोजगार निर्माण करणे व अर्थव्यवस्थेला पर्यटनाच्या माध्यमातून चालना देणे हा यामागचा मुख्य हेतू.
- महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने भारतीय नौदलास त्यांच्या कडील उपलब्ध निवृत्त युद्ध नौका महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास विनामोबदला देणे बाबत दि.०७ जुन २०२३ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली. तदनंतर महामंडळाने प्रस्तावित प्रकल्पाचा अंदाजित रु.२०कोटी रुपयांचा सविस्तर प्रकल्प अहवाल बनवला.
- भारतीय नौदलाने त्यांचेकडील एक निवृत्त जहाज महामंडळास देण्यास दि.२२.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्राथमिक सहमती दर्शवली.

जहाजाचे संक्षिप्त स्वरूप खालीलप्रमाणे;

| NO. | CHARACTERSTICS | DETAILS |
|---|---|---|
| 1 | Name of Ship | INS Guldar |
| 2 | Country of Origin | Poland |
| 3 | Class & Type | Kumbhir Class Landing Ship |
| 4 | Displacement | 1120 Tons. |
| 5 | Length | 83.9 mtr |
| 6 | Beam | 9.7 mtr |
| 7 | Draught | 1.3 mtr (Bow) 2.58 m (Stern) |
| 8 | Depth | 5.2 Mtr |
| 9 | Complement | 120 Personnel |
| 10 | Aircraft Carrier | 1 HAL Cheta |

| | | |
|---|---|---|
| 11 | Commissioned | December, 1985 |
| 12 | Decommissioned | 12 January 2024 |
| **13** | Permanent Number | L 21 |

- दि.२७/११/२०२४ रोजीच्या Director (PF-S) वित्त विभाग भारत सरकार नवी दिल्ली यांनी सदर प्रकल्पाकरिता भारतीय नौदलाची निवृत्त युद्धनौका Ex - INS Guldar Underwater Museum, Artificial reef and Submarine Tourism, Sindhudurg या प्रकल्पास रु.४६.९१ कोटी रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान केली.

- पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या दि.२७/१२/२०२४ रोजीच्या शासन निर्णयनुसार केंद्र शासनाकडून राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य सन २०२४-२५ या योजनेचा भाग -३ Development of Iconic Tourist Centers to Global Scale या प्रकल्पाकरिता चालूवित्तीय वर्षातील तरतुदीमधून रु.३०.९५ कोटी रक्कमेचा (६६%) निधी वितरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली.

- भारतीय नौदलाने सदरचे निवृत्त जहाज हे पोर्ट ब्लेयर, अंदमान येथून कोचीन व तेथून कारवार नेव्हल बेस, कारवार कर्नाटका येथेपर्यंत पोहोच करण्याचे मान्य केले असून सदरचे जहाज सिंधुदुर्ग येथील विजयदुर्ग या सुरक्षित ठिकाणी आणण्याकरिता (Tow) तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सुयोग्य ठिकाणी (Longitude - Latitude) समुद्राच्या तळाशी नेण्याकरिता कळविणेबाबत दि.०३.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये विचारणा केली असता, महाराष्ट्र सागरी मंडळाच्या (MMB) वरिष्ठ अधिकारी (CPO) यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग जेट्टी येथे सदरचे जहाज Anchor करण्यास तत्वतः मान्यता दिली असून निवती रॉक याठिकाणी सदरचे जहाज समुद्राच्या तळाशी नेण्याकरिता Longitude - Latitude बाबत योग्य ठिकाण सुचविले असून त्याबाबतचे अधिकृत पत्र हे दि.०७.०२.२०२५ व दि.२५.०३.२०२५ रोजी मिळाले आहे.

- सदरचे जहाज सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग बंदरात भारतीय नौदलातर्फे हस्तांतरित करून घेणे त्याकरिता आवश्यक Tug Boat Operator ची नियुक्ती करणे, जहाजाचे पर्यावरणीय साफ-सफाई करणे, पुढील ६-७ महिने सदरचे जहाज सुरक्षितरित्या ठेवणे व आवश्यकतेनुसार वेळोवेळी योग्य त्या ठिकाणी ने-आन करणे, प्रशिक्षित व तांत्रिक मनुष्यबळ नियुक्त करणे याकरिता ई-निविदा प्रकाशित करण्यात आलेल्या असून त्यापैकी जहाज कारवार येथून विजयदुर्ग येथे खेचून आणणेकरिता मे. बीएसए मरीन यांची नियुक्ती करण्यात आली होती त्यांनी, सुरक्षितरीत्या जहाज विजयदुर्ग येथील MMB जेट्टीला जहाज दि.१६/०३/२०२५ रोजी पोहोच केले आहे, तसेच पर्यावरणीय साफ - सफाई

करिता मे.एसएसआर मरीन सेर्विसेस यांना दि. २२/०३/२०२५ रोजी कार्यादेश देण्यात आला असून त्यांनी दि.२२/०४/२०२५ रोजी जहाजाची पर्यावरणीय साफ - सफाई पूर्ण केली आहे.

- सध्यस्थितीत माझगाव डॉक शिप बिल्डर्स (MDL) यांना सदर जहाजाचे समुद्रात कृत्रिम प्रवाळ निर्माण करणे (Scuttling) करिता दि.१५/०४/२०२५ रोजी कार्यादेश देण्यात आला असून त्यावर कार्यवाही सुरु असून सदर प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात अंतिम लक्ष पूर्ण करणेबाबत प्रस्तावित आहे.

XXX